INSPIRATION : D.D.GAWARE, SAHEB, Additional, S.P. Anti Corruption Bureau, (Retd),Maharashtra State
www.crimeborder.com ★Year 12 ★Issue 12 ★ Pages - 4 ★ KalyanmDist Thane , 30 September 2022 ★ Price 5.00 /-

# क्राईम बॉर्डर

पोलीस व गुन्हेगारी जगताची बित्तंबातमी देणारे
R.N.I. No. : MAHBIL/2010/41122 Mob- 9619630035




★ वर्ष : १२ ★ अंक : १२ ★ पाने : ४ ★ कल्याण, जि. ठाणे, ★ ३० सप्टेंबर २०२२ ★ मूल्य : रु ५.००/- नोंदणी क्र.एमएएचबीआयएल/२०१०/४११२२

## लग्न जमवण्यसाठी प्रविणने दिले चाळीस हजार ना लग्न, ना पैसे परत, नरेशने केले त्यालाच ठार!



राजेंद्र वखरे

**क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क**

**पनवेल** :आपल्या भारत देशामध्ये बेटी बचाव, बेटी पढाव हा नारा गुंजत असून मुली ह्या मुलांपेक्षा कमी नाहीत, मुली व महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात काम करीत आहे परंतु अजूनही पुरुषांची मानसिकता बदललेली दिसत नाही. त्यांना त्यांच्या वंशाला दिवा लावण्यासाठी मुलगाच हवा आहे. त्यामुळे मुलींची संख्या मुलांच्या संख्येपेक्षा कमीच आहे.काही समाजा मध्ये तरुण मुलांना लग्नासाठी मुलीच मिळत नाही हे वास्तव आहे.

मुलांचे लग्नाचे वय निघून जात असल्याने जो तो मुलगी मिळवण्या साठी अनेक खटपटी करून पैसे खर्च करून लग्न करतो काहींना मुली लग्नासाठी मिळतात परंतु काही तरुणांना तर पैसे देऊन लग्नासाठी मुली मिळत नाही याचाच फायदा गोरख धंदे करणारे घेताना दिसतात. अलीकडे तर काही टोळ्या महाराष्ट्र राज्यात कार्यरत असून काहींना पोलीसांनी पकडले सुद्धा आहे.या टोळ्यांमध्ये काही तरुण मुलं, मुली, मध्यमवयीन मुली, मुलं यांना घेऊन पुरुष व महिला एकत्र होऊन ज्यांना लग्नासाठी मुलगी हवी आहे, अशांना शोधून ते संपर्क साधतात व त्यांच्यातीलच एखादी सुंदर मुलगी लग्नाची असल्याचे दाखवतात. कुणी त्या मुलीचा भाऊ होतो तर कुणी आई, वडील, बहिण असे संपूर्ण कुटुंब ते तयार करतात ते कुटुंब संपूर्णत: आभासी असते, खोटे असते आणि अशा या भुलथापा देणाऱ्या कुटुंबाच्या शब्दांवर विश्वास ठेवून अनेक कुटुंबे व ज्यांना कुणीच नाही परंतु लग्नासाठी मुलगी हवी आहे असे तरुण याला बळी पडतात फसतात. अशाच प्रकारे काही समाजकंटक लोकं अशी दुकानं थाटून लग्न लावून देतो आमच्या कडे अनेक स्थळ आहे असे सांगून रजिस्ट्रेशनच्या नावाखालीही पैसे उकळतांना आपल्याला पाहायला मिळतात आणि याचे लोन हे संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेले आहे.काही बहाद्दर तर ...अंती दुर्गम भागातील आदिवासी व गरीब कुटुंबातील अल्पवयीन व तरुण मुली मुंबईमध्ये किंवा इतर शहरांमध्ये नोकरीच्या निमित्ताने आणतात व त्यांचा वापर अशा खोट्या लग्नासाठी करतात किंवा त्यांना ते गरजू लग्नाळू मुलांना/ कुटुंबांना विकतात. काही कुटुंबामध्ये जास्त मुली असतात व त्यांचं पालक पोषण होत नसल्याने काही उर्वरीत पान २ वर...


डि.सी.पी. **शिवराज पाटील**, व.पो.निरी. **रवींद्र दौंडकर**

## प्रेमाची पडली भूल, धोक्याची नव्हती चाहूल! ब्लॅकमेल करत तिच्यावर बलात्कार करी राहूल!



सौ.सिमा वखरे

**क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क**

**अंबरनाथ**: अस्मिता ही २०वर्ष वयाची तरुणी उल्हासनगर नं.४मध्ये तिची आई व आजी यांच्यासोबत रहायला आहे. घरखर्च चालविण्यासाठी अस्मिता ची आई लहान मुलांच्या ट्युशन्स घेवून आपला घरखर्च व अस्मिताचे शिक्षण पूर्ण करत आहे. अस्मिता ही लहानपणा पासूनच चंचल स्वभावाची असल्याने तिच्या अनेक मित्र मैत्रीणी होत्या. अस्मिता ही मागच्या वर्षी कल्याण पूर्वेतील एका कॉलेजमध्ये एस.वाय.बी. कॉम.च्या वर्षात शिक्षण घेत होती. कॉलेजमध्ये ती सर्वांशीच चांगली वागत असल्याने तिचा स्वभाव तिच्या मित्र व मैत्रीणींना आवडत होता. तिला शिकून खूप मोठे व्हायचे होते. कारण की, तिची आई तिच्यासाठी खूप कष्ट घेत असल्याची ती लहानपणापासूनच बघत होती. ही आधुनिक युगातली तरुणी असल्याने तिला सोशल मिडीया नवीन नव्हता. ती फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉटस्अप, ट्विटर असे माध्यमं वापरत होती.तरुण व सुंदर असल्याने तिला जाळ्यात ओढण्यासाठी अनेक कॉलेज तरुण फासे टाकत होते. ती कुणाच्याही जाळ्यात अडकत नव्हती. कारण तिने तिचे ध्येय पक्के केले होते. परंतु इन्स्टाग्रामच्या माध्यमातून तिला राहूल भेटला. सोशल मिडियावर त्यांची ओळख झाली.हळूहळू राहूल व अस्मिता यांच्यात बोलणं होवू लागले. पुढे पुढे त्या दोघांना एकमेकांशी बोलल्या शिवाय करमत नव्हते. अस्मिता रहायला उल्हासनगर ४ मध्ये तर राहूल हा अंबरनाथ पूर्व याठिकाणी राहणार असल्याने त्यांच्यात जवळीक व्हायला वेळ लागला नाही. मार्च २०२१ मध्ये इन्स्टाग्रामवरुन या दोघांमध्ये झालेली मैत्री हळूहळू वाढत जावून एक दिवस तिला भेटायची इच्छा व्यक्त केली. राहूलने तिला त्याच दिवशी प्रपोज केले. तिने त्यांच्याकडून उर्वरीत पान ३ वर...


व.पो.निरी. **मधूकर भोगे**


ए.पी.आय. **जयेंद्र भोयर**


म.ए.पी.आय. **सुप्रिया देशमुख**

## टू व्हिलर चोरणारा गजाआड, विष्णुनगर पोलीसांची उत्तम कामगिरी!

**क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क**

**डोंबिवली** :कल्याण डोंबिवली परिसरामध्ये गेल्या काही महिन्यां पासून नागरिकांनी त्यांच्या घराबाहेर लावलेल्या मोटरसायकली तसेच रेल्वे स्टेशन परिसर व अन्य ठिकाणी नागरिक त्यांच्या टू व्हीलर गाड्या पार्क करून त्यांच्या कामावर जात असल्याचे पाहून परिसरामध्ये टू व्हीलर व लहान मुलांच्या सायकली चोरण्याचे प्रमाण वाढले होते.यामुळे नागरिंकात भीतीचे वातावरण पसरल्याने वरिष्ठांनी आपापल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीसांना असे गुन्हे करणाऱ्यांना तात्काळ अटक करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने विष्णूनगर पोलीस ठाण्याचे व.पो.निरी.पंढरीनाथ भालेराव यांनी एसीपी सुनील कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ डिटेक्शन ब्रांच चे फौजदार कुलदीप मोरे व पो. शि. कुंदन भामरे यांना बोलवून परिसरात टू व्हीलर मोटरसायकली व लहान मुलांच्या सायकली चोरून उच्छाद मांडणाऱ्या आरोपींना तात्काळ शोधून काढण्याचे आदेश दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ डिटेक्शन ब्रांचचे फौजदार कुलदीप मोरे व पो. शि. कुंदन भामरे यांनी त्यांच्या खबऱ्यांना कामाला लावले व ते स्वत: या परिसरात अशा चोरांचा शोध घेऊ लागले परंतु हे भुरटे चोर सापडत नव्हते परंतु त्यांनी त्यांचा तपास सुरूच ठेवला. तपास सुरू असतांना पो.शि. कुंदन भामरे यांना त्यांच्या खबऱ्याने माहिती दिली की साहेब टू व्हीलर गाड्या मास्टर की ने सुरु करून चोरुन घेऊन जाणारी टोळी कार्यरत असून त्यांच्यातील एक सदस्य हा डोंबिवली वेस्ट परिसरातील गाड्या चोरून घेऊन जातो व कमी किमतीत विकून टाकतो अशी माहिती दिली. अशाप्रकारे गाड्या चोरून विकणारा इसम हा डोंबिवली पूर्वे कडील ९० फीट परिसरात तुम्हाला सापडू शकेल कारण त्या ठिकाणी ही सर्व टोळी आपापसात संगणमत करून गाड्या चोरत असतात.अशा प्रकारचा तपास सुरू असतानाच डोंबिवली विष्णूनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिंधू जयकुमार पिल्ले वय वर्ष ४३ यांनी दि. २ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी साडेनऊ वाजता त्यांची हिरो कंपनीची टू व्हीलर गाडी महात्मा फुले रोड रिक्षा स्टँड डोंबिवली पश्चिम या ठिकाणी पार्क केली व ते त्यांच्या कामा साठी निघून गेल्या.त्यांचे काम करून त्या परत आल्या असता त्यांना त्यांची हिरो कंपनीची मोटरसायकल तिथे दिसून आली नाही. त्यांनी खूप शोध घेतला परंतु मिळून न आल्याने त्यांनी विष्णूनगर पोलीस ठाण्यात गाडी चोरून नेल्याची तक्रार नोंदविली त्यानुसार गु.रजि. नं.२८७/२०, भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली. सदर गुन्ह्यांच्या अनुषंगाने तपास सुरू झाला तपासा दरम्यान पो. शि. कुंदन भामरे यांना त्यांच्या गुप्त खबऱ्याने खबर दिली की, साहेब सदर गुन्ह्यांतील मोटर सायकल सोडणारा संशयित आरोपी हा ९० फुटी रोड डोंबिवली पूर्व या ठिकाणी उभा आहे.तात्काळ माहिती मिळतात पो.शि.कुंदन भामरे यांनी डिटेक्शन ब्रांचचे फौजदार कुलदीप मोरे यांना सदर माहिती सांगितली असता ते तात्काळ ९० फुटी रस्त्यावर साध्या वेशात गेले, असता त्यांना एका आड बाजूला एक संशयित इसम मोटर सायकल घेऊन उभा असतांना दिसला. तात्काळ उर्वरीत पान ३ वर...


वपोनि.**पंढरीनाथ भालेराव**


पो.उप.निरी.**कुलदीप मोरे**


पो.शि. **कुंदन भामरे**

## निर्दयी मुलाने दिला आईला गळफास स्वत:वर केले वार, आईने आत्महत्या केल्याचा केला बनाव!



सौ.सिमा वखरे

**क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क**

**कल्याण** :काही दिवसापूर्वी एका माथेफिरु सुशिक्षित मुलाने टिटवाळा येथे आपल्या वृद्ध आई-वडिलांचा निर्घुनपणे खून केल्याची घटना ताजी असतानांच कल्याण पूर्व मध्ये अशाच एका नराधमा ने आपल्या विधवा आईचा खून केल्याची घटना घडल्याने हळहळ व्यक्त भेद असून अशा घटना घडत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. सरोजा पुमणी वय ६४ ह्या त्यांचा मुलगा रवी पुमणी वय ३४ याच्यासोबत कल्याण पूर्वेतील हनुमान नगरात असलेल्या प्रभू राम अपारमेंट मधील तिसऱ्या मजल्यावर फ्लॅट नंबर २३ मध्ये राहायला होत्या. सरोजा यांना एक मुलगा व एक मुलगी असून मुलगी पुष्पलता हिचे लग्न झाले असून ती कल्याण पूर्वेतच त्यांच्या घरापासून थोड्या अंतरावर तिचा मुलगा व पती सेंथिवेल मद स्वामी व ४३ यांच्या समवेत राहायला आहे. पुष्पलताचा संसार अगदी आनंदी व सुरळीत सुरू असून तिचा पती एका चांगल्या कंपनीत नोकरीला आहे. त्यामुळे मुलीचा संसार आनंदी पाहून सरोजा खुश होत्या. सरोजा पुमणी यांचे पती हे रेल्वेमध्ये नोकरीला होते. यापूर्वी हे कुटुंब धारावी या ठिकाणी राहायला होते परंतु रेल्वेतून रिटायरमेंट घेऊन हे कुटुंब कल्याण पूर्वेत भाड्याने घर घेऊन राहत होते. कारण की मुलगी आपल्या डोळ्यासमोर राहील व आळी अडचणीच्या वेळी आपण एकमेकांना मदत करू या उद्देशाने सरोजा यांनी कल्याण येथे भाड्याने घर घेतले होते.

सरोजा यांचा अगदी सुखी संसार होता कसली काळजी नव्हती परंतु मागच्या वर्षी सरोजा यांच्या पतीचे निधन झाले आणि सर्व जबाबदारी सरोजा यांच्यावर येऊन पडली पेन्शनवर घरातील उदरनिर्वाह चालत होता. मुलगा रवी याने काहीतरी करून आपल्या पायावर उभे राहावे असे सरोजा यांना वाटत होते. रवी हा शिकलेला असल्याने त्याच्याकडून आई व बहिणीची खूप अपेक्षा होती. रवी हा तापट स्वभावाचा असल्याने तो मनाला येईल तसे वागत होता. रवी हा ऐरोली येथील एका कंपनीत गेल्या काही वर्षांपूर्वी लागला होता आणि तो लॉकडाऊन च्या वेळी वर्क फ्रॉम होम करत असल्याने तो फक्त अधून मधूनच कंपनीत जात असे. रवीला कोणी म्हणणारे व बोलणारे नसल्याने त्याची हिम्मत वाढून तो सुरुवातीला मौज मजा म्हणून दारू पिऊ लागला. सुरुवातीला मौजमजा म्हणून पिणारी दारू आता त्याचे व्यसन बनली होती. त्याला आता दररोज प्यायला दारू लागत होती तो फक्त दारू पिऊन व खाण्यापिण्यातच त्याचा पगार खर्च होऊ लागल्याने त्याला पैशाची चणचण भासू लागली म्हणून तो त्याच्या आईकडून दारू पिण्यासाठी पैसे मागायचा सुरु वातीला आई त्याला पैसे द्यायची परंतु मुलाचे लग्न करावे असा विचार करून आपण मुलाला पैसे दिले नाही तर तो दारू पिणार नाही अशा या भोळ्या समजुतीने सरोजा यांनी त्याला पैसे देणे बंद केले. त्यामुळे रवी चिडला आणि उर्वरीत पान ३ वर...


डि.सी.पी. **सचीन गुंजाळ**


ए.सी.पी. **यु.एस.मानेपाटील**


व.पो.निरी. **डी.डी.देशमुख**


ए.पी.आय. **निशा चव्हाण**

# लग्न जमवण्यसाठी प्रविणने दिले चाळीस हजार, ना लग्न, ना पैसे परत, नरेशने केले त्यालाच ठार!

पान नं. १ वरुन... महाभाग आई-वडील मुलींना थोड्या पैशासाठी विकूनही टाकतात अशा घटना अधून मधून वृत्त पत्रातून प्रकाशित होतांना आपण वाचतो.पोलीस व सामाजिक संस्था अशा घटना घडवू नये म्हणून यासाठी ते प्रयत्न करतात परंतु यातून खूपच कमी लोक शिकवण घेतांना आपल्याला दिसतात.अशाच प्रकारे नवी मुंबई जवळील पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या गावातील अविवाहित तरुणाचा खून झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

त्या दिवशी पनवेल तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या टावरवाडी, गालडुंगे गाव, पोस्ट वाजे, तालुका पनवेल या शिवारातील टावरवाडी ते वांगणी बदलापूर या पायवाटेने एक इसम जात असतांना त्याला कसला तरी उग्र दर्प आला त्याने नाकाला रुमाल लावत कुठून वास येत आहे हे उत्सुकतेपोटी हा वास कशाचा आहे याची खात्री करण्यासाठी तो त्या पायवाटे पासून वासाच्या दिशेने गेला असता त्याला झाडीझुडपात वास येत असल्याचे दिसले त्याने जवळ पाहून पाहिले असता त्याला एक इसम कुजलेल्या अवस्थेत मरून पडलेला दिसला त्याचा चेहरा तिक्ष्ण हत्याराने घाव घालून विद्रूप करून केलेला व तो ओळखू येत नव्हता ते पाहून तो इसम घाबरला आणि त्याने तात्काळ टावरवाडी गाव गाठले व तेथील गावकऱ्यांना या संदर्भात माहिती दिली.त्याची ही माहिती ऐकताच टावरवाडी गावातील काही मोजके लोकं हे त्या घटनास्थळी पोहोचले व त्यांनी सुद्धा पाहिले की त्या ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसम मरून पडलेला असून त्याचा कुणीतरी खून करून त्याची बॉडी त्या ठिकाणी टाकून दिली आहे. हे त्यांच्या निदर्शनास आले असता त्यांनी पनवेल तालुका पोलीसांना माहिती दिली की, साहेब टावरवाडी- मालडुंगे गाव, पोस्ट वाजे तालुका कल्याण जिल्हा रायगड येथून आम्ही नागरिक बोलत असून टावरवाडी वांगणी बदलापूर या रस्त्याच्या पायवाट्याने एक इसम जात असतांना पाय वाटेपासून काही अंतरावर झाडी झुडपात एका इसमाचा कुजलेला मृतदेह त्याला दिसला असल्याची माहिती त्याने दिली व आम्ही गावकरी या ठिकाणी आलो असता त्याने दिलेली माहिती खरी असल्याचे आम्हाला दिसले आहे, तरी तुम्ही ताबडतोब या ठिकाणी या अशी माहिती त्यांनी पोलिसांना दिली.

पनवेल तालुका पोलीस ठाण्यात ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांने तात्काळ या गंभीर घटनेची माहिती आपल्या वरिष्ठांना दिली. वरिष्ठांनी या गंभीर घटनेची तातडीने दखल घेऊन पनवेल तालुका पोलीस ठाण्यातील वरिष्ठ आपल्या पोलीस पथकासह घटनास्थळी पोहोचले त्या ठिकाणी पोलिसांना टावरवाडी वांगणी बदलापूर जाणाऱ्या पायवाटेच्या काही अंतरावर दाट झाडी झुडपात अनोळखी मृतदेह दिसला. पोलीस जसजसे त्या मृतदेहाजवळ जात होते तस तसा तेथून घाणेरडा दर्प परिसरातून त्यांना येत होता.पोलीसांनी नाकावर रुमाल ठेवून त्या प्रेताजवळ ते गेले ते प्रेत कुजलेले होते व त्याचा चेहरा ओळखू येऊ नये म्हणून विद्रूप केलेला पोलीसांना दिसला. पोलीसांनी सदर मृतदेहाची व आजूबाजूच्या परिसराची बारकाईने पाहणी केली असता पोलीसांच्या असे निदर्शनात आले की, सदर इसमाचा कुणीतरी अज्ञात कारणावरून खून करून तीक्ष्ण हत्याराने व चेहरा ओळखू येऊ नये म्हणून घाव घालून तो विद्रुप करून त्याच्या खांद्या वरील भाग,मान,चेहरा हा ज्वलनशील पदार्थाने जाळून टाकलेला दिसत होता, सदर इसमाचा खून करून चार-पाच दिवस झाले असावेत कारण की तो मृतदेह कुजून त्यावर किडे लागलेले पोलीसांना दिसत होते. सदर घटनेची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांनी वरिष्ठांना दिली असता घटनास्थळाला डीसीपी शिवराज पाटील परिमंडळ -२, एसीपी भागवत सोनवणे पनवेल विभाग, एसीपी धनाजी शिरसागर पोर्ट विभाग यांनी भेट देऊन मार्गदर्शन करीत काही महत्त्वपूर्ण सूचना देऊन आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले सदर इसमाचा खून झाल्याचे स्पष्ट झाले दिसत होते परंतु घटनास्थळी आरोपींनी कुठलाही धागा दोरा मागे सोडलेला नव्हता तसेच आजू बाजूला कुठल्याही प्रकारचे सीसीटीव्ही फुटेज नव्हते त्यामुळे पोलीसांना अनेक अडचणी येत होत्या त्याकरिता या अनोळखी इसमची ओळख पटवून त्याचा खून कोणी व का केला याचा तपास करून आरोपींना पकडण्यासाठी डीसीपी शिवराज पाटील यांनी तातडीने आरोपीला पकडण्यासाठी पाच पथक तयार करण्याचे आदेश दिले. यामध्ये एपीआय अविनाश पाळदे, एपीआय संजय गळवे, एपीआय निलेश फुले, एपीआय विवेक भोईर व फौजदार आकाश पवार अशा पाच जणांच्या नेतृत्वा खाली स्वतंत्र टीम तयार करून आरोपींचा शोध घेण्यास सांगितले. सदर गुन्ह्याचे घटनास्थळ हे निर्जनासाठी असल्याने घटनास्थळी व आजूबाजूला व परिसरात सीसीटीव्ही फुटेज कॅमेरे नसल्याने उपलब्ध नव्हते सतत चार दिवस पोलीस त्या परिसरामध्ये सिव्हिलड्रेस मध्ये फिरत होते व त्यांनी तांत्रिक पद्धतीचा अवलंब करून अत्यंत मेहनतीने व बुद्धी चातुर्याने आजूबाजूच्या गावांमधून घटनास्थळाकडे येणाऱ्या व जाणाऱ्या रस्त्यांचे एकूण पंधरा ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज पोलीसांनी प्राप्त केले आणि प्रेत ज्या ठिकाणी मिळून आले होते त्या घटनास्थळाकडे चार दिवस अगोदर आजूबाजूच्या गावांमधून आलेल्या व गेलेल्या इसमांची यादी त्यांनी तयार केली व त्या फुटेज मध्ये मयत इसम किंवा कोणी दिसून येतो का याची पाहणी सुरू केली असता त्यामध्ये मयताचे अर्धवट जळालेले कपड्याचे साधर्म्य असलेली हाफ पॅन्ट घातलेली एक व्यक्ती ही एका ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये एका स्कुटी वरून तीन इसमांसो सोबत टावरवाडीच्या दिशेने जातांना पोलीसांना दिसला.तोच धागा पकडून त्याबाबत पोलीसांनी सखोल तपास आरभंला. आणि सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसणारी व्यक्ती ही कोण आहे? व तीच व्यक्ती कुणाला माहित आहे का? याचा तपास सुरू केला आणि सदर स्कुटी ही झूम करून तिचा नंबर शोधून काढला व ही स्कुटी कुणाची आहे, याचा पोलीसांनी तपास केला असता त्यांना एका दुकानांमध्ये सदर हाफ पॅन्ट घातलेला इसम किरकोळ खरेदी करतांना गुगल पे च्या माध्यमातून पेमेंट करीत असल्याचे सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसून आले सदर प्राप्त झालेल्या माहितीवरून व तांत्रिक तपासावरून माहिती शोधून काढण्यासाठी पोलीसांनी तपास सुरू केला. पोलीसांना मयत यांचे नाव प्रवीण सुरेश शेलार असल्याचे समजले आणि पोलिसांनी त्याची ओळख फोटो वरून गावकऱ्यांकडून करून घेतली गाव कऱ्यांनी त्या सीसीटीव्ही फुटेज मधील इसम हा प्रवीण सुरेश शेलार असल्याचेच सांगितले. मग पोलीसांनी सीसीटीव्ही फुटेज मधील हाफ पॅन्ट घातलेला प्रवीण सुरेश शेलार व मयत झालेला इसम हे एकच असल्याचे त्यांच्या लक्षात आले मग पोलीसांनी मयत प्रवीण चे घर शोधून काढले व ते तेथे गेले. प्रवीणच्या घरी पोलीस पथक तपासा साठी गेले असता त्याच्या घरी त्याची वृध्द आई व भाऊ त्यांना मिळून आले परंतु ते दोघेही मनोरुग्न असल्याचे पोलीसांच्या निदर्शनास आले. त्यांच्याकडे पोलीसांनी प्रवीण कुठे आहे? याबाबत विचारणा केली असता त्या दोघेही मायलेकांना प्रवीण कुठे आहे याची काही एक सुतराम माहिती नव्हती. त्यानंतर पोलीसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे त्या स्कुटी वरील तिघा इसमांचा शोध सुरू केला आणि पोलीसांनी ते सर्वजण प्रवीणला घेऊन कुठे गेले याची चौकशी परिसरात केली व त्यांना त्यांच्या गुप्त खबऱ्याने माहिती दिली की, साहेब याच तिघांनी प्रवीणला २५ तारखेला सायंकाळी साडेपाचच्या सुमारास त्यांच्या स्कुटीवर बसवून ते कुठेतरी घेऊन गेले होते .त्या सर्वांचे नावं पोलीसांना समजले आणि पोलीसांनी मग या तांत्रिक माहितीच्या आधारे व प्रत्यक्ष प्रवीणला घेऊन जातांना ज्यांनी ज्यांनी पाहिले त्यांच्या साक्षीवरून नरेश शांताराम बेटकर वय वर्ष ४२त्याचे मूळ गाव मु.पो. मेघी,ता. संगमेश्वर ,जि. रत्नागिरी यास तांत्रिक तपासावरून त्याला विसरली बुद्रुक येथून ताब्यात घेतले आणि त्याला पोलीस ठाण्यात आणून त्याच्याकडे प्रवीणच्या खूना संदर्भात चौकशी केली असता तो सुरुवातीला काहीही माहिती देत नव्हता. तो उडवाउळवीची उत्तरे देऊन पोलीसांची दिशाभूल करीत होता. परंतु पोलीसांनी त्याला खास पोलिसी इंगा दाखविला असता तो सुता सारखा सरळ झाला. त्याने गुन्ह्याची कबुली देत या गुन्ह्यांमध्ये त्याचे दोन साथीदार सहभागी असल्याचे ही त्याने पोलीसांना सांगितले. ते तुझे दोघे मित्र कुठे आहेत याबाबत विचारणा केली असता ते दोघेही त्यांच्या मूळ गावी उत्तर प्रदेशात पळून गेल्याचे नरेशने सांगितले. मग पोलसांनी पनवेल पोलीस ठाण्यात गु.रजि.नं.१७०/२०२२ भा.द.वि.कलम ३०२, २०१, ३४. प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली. आणि प्रवीण च्या खुणा संदर्भात नरेश बेटकर याला कोर्टात हजर केले असता त्याला पोलिसांनी पोलीस कोठडी सुनावली आता पनवेल पोलीसांना पाहिजे असलेले दोन संशयित आरोपी पकडायचे होते. या कामासाठी एपीआय संजय गळवे यांचे पथक उत्तर प्रदेशांमध्ये रवाना झाले अगोदरच पोलीसांनी संशयित आरोपींच्या घराबद्दल व ते कुठे मिळू शकतील याबद्दल माहिती काढलेली होती. हे सर्व पथक उत्तर प्रदेशात पोहोचले तिथे त्यांनी उत्तर प्रदेश पोलीसांच्या स्पेशल टास्क फोर्स च्या मदतीने पाहिजे असलेले संशयित आरोपी दिलीप प्रेमराज शुक्ला वय ३४ वर्ष व अमरसिंग दया शंकर सिंह २५ वर्ष हे दोघेही राहणार खेमेपुर, खैरुद्दिन्दपूर, ता.फुलपूर, जि.अजमगड राज्य उत्तर प्रदेश या दोघांची एस पी एफ पुणे माहिती काढून या दोघांनाही त्यांच्या घरातून अटक केली त्यानंतर तेथील कोर्टात त्यांना हजर करून त्यांना महाराष्ट्रातील पनवेल पोलीस ठाण्यात आणण्यात आले त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली त्यांना कोर्टात हजर केले असता आधी चौकशीसाठी कोर्टाने पोलीस कोठडी सुनावली पोलीस कोठडी दरम्यान या सर्वांनी त्यांच्या गुन्ह्याची कबुली देऊन त्यांनी गुन्हा का? व कशासाठी केला याची पोलीसांना माहिती दिली. यातील यापूर्वीच अटकेत असलेला संशयित आरोपी नरेश शांताराम बेटकर व ज्याचा खून झाला तो मयत प्रविण शेलार हे दोघेजण चांगले मित्र होते. यातील प्रवीण हा अविवाहित असून त्याला लग्ना साठी एका मुलीची आवश्यकता होती परंतु त्याला लग्नासाठी मुलगी मिळत नव्हती परंतु नरेश प्रवीणला म्हणाला की तू काही काळजी करू नको मित्रा अशा मुली लग्नासाठी मिळत असतात मी तुला मुलगी मिळवून देईल परंतु त्यासाठी तुला खर्च करावा लागेल तेव्हा प्रवीण म्हणाला की ठीक आहे.जर माझे लग्न होत असेल तर मी त्यासाठी पैसे द्यायला तयार आहे मग या कामासाठी नरेशने प्रवीण कडून ४०,०००/- रुपये घेतले व तो म्हणाला की, तू काळजी करू नकोस मी आता त्या मुलींच्या आई-वडिलांकडे जाऊन त्यांना हे पैसे देतो व तुमचं लग्न पक्का करून लावून देतो. प्रवीणला वाटले की आता आपले लग्न होईल कारण त्याला माहीत होते की काही मुलींचे आई-वडील पैसे घेऊन मुलींचे लग्न करून देत असतात अशाच प्रकारे आपला मित्रही आपले लग्न करून देईल या आशेवर तो बसला दिवसा मागून दिवस जात होते. प्रवीणला लग्नाची घाई झाली होती कारण त्याच्या घरामध्ये त्याची आई व भाऊ मनोरुग्ण असल्याने सगळेच कामकाज प्रवीणला करावे लागत होते. त्यासाठी त्याला त्याची हक्काची पत्नी हवी होती की ती त्याचे व त्याच्या घरातील आई व भावाचेही काम करेल व त्याचा संसार सुखाचा होईल असे तो भावी सुखी स्वप्न बघत होता परंतु दिवसा मागून दिवस जाऊनही आपला मित्र नरेश हा आपले लग्न जुळवून देत नाही म्हणून त्याला शंका आली की आपली फसगत तर झाली नसावी शेवटी तो म्हणाला की, मित्रा नरेश तुझ्याकडून जर माझे लग्न जमत नसेल तर तू माझ्याकडून घेतलेले चाळीस हजार रुपये तू मला परत कर मी माझे लग्न दुसरीकडून कुणाकडूनही करून घेईल. हे ऐकताच नरेशेच्या पायाखालची वाळू सरकली -प्रवीण हा त्याच्या पैशासाठी त्याच्याकडे तकादा लावू लागला होता. प्रवीणला ४०,०००/-रुपये न देता त्याने घरासाठी दिलेले सहा लाख रुपये आपल्याला मिळावे म्हणून नरेशने एक मोठा प्लॅन केला रचला होता .त्याने या कामासाठी त्याचे दोन्ही मित्र दिलीप शुक्ला व अमरसिंग दयाशंकर सिंह यांना गोड बोलून या कटात सामील करून घेतले होते की, मी प्रवीण कडून लग्नाच्या निमित्ताने चाळीस हजार रुपये घेतले आहे त्यातील काही पैसे मी तुम्हाला देईल त्यानंतर आपण प्रवीणचा खून करून टाकू कारण की प्रवीणने त्याच्यासाठी नवीन घर बुक केले होते व त्याचे सहा लाख रुपये त्याने भरलेले होते आपण प्रवीणला मारून टाकल्यानंतर त्याच्या मनोरुग्ण असलेल्या आईकडून अंगठा घेऊन त्याने बुक केलेले घर रद्द करू व ते सहा लाख रुपये तिघांमध्ये वाटून घेऊ असा त्याचा प्लान झाला होता व त्यानुसारच त्यांचे काम सुरू होते जेव्हा प्रवीणने पैशाची मागणी केली तेव्हा नरेशने कटकारस्थान रचून मित्रांच्या मदतीने प्रवीणला गोड बोलून त्यांच्यासोबत घेतले व स्कूटरवर बसवून तो टावरवाडी ते वांगणी बदलापूर या सूनसान रस्त्याने त्याला घेऊन गेले सायंकाळची वेळ असल्याने तिकडे चिटपाखरूही नव्हते.या तिघांनी त्याचा गमचा अर्थात रुमालाने त्याच्या गळ्याला फास देऊन त्याचा खून करून टाकला त्याचा चेहरा ओळखू येऊ नये म्हणून त्या सर्वांनी धारदार शस्त्राने व दगडाने त्याचा चेहरा विद्रूप करून टाकला. जेणेकरून त्या प्रेताची ओळख पाठवू नये. तिघांनी प्रवीणचा खून करण्याच्या दोन दिवस अगोदर दारू पिण्याच्या बहाण्याने प्रवीणच्या घरी दोन दिवस टाईमपास केला.त्याचा विश्वास संपादन केल्यावर घटनेच्या दिवशी गोड बोलून दारू प्यायला आपण बाहेर जाऊ व निसर्गाचा आनंद घेऊ अशा बहाण्याने त्याला ज्युपिटर स्कूटीवर बसवून निर्जन स्थळी ते घेऊन गेले आणि सायंकाळी साधारणता सात वाजेच्या दरम्यान यांनी गमच्याने गळा आवळून प्रविणचा खून केला आणि धारदार शस्त्र व दगडाने प्रवीण चा चेहरा ठेचून मृतदेह दाटज झाडी झुडपात टाकून दिला.

एवढंच नव्हे तर दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजता घटनास्थळी हे तिघेजण अंधारातच स्कुटीवर येऊन ते प्रेत कोणी ओळखू नये यासाठी त्यांनी एका बाटलीत पेट्रोल पंपावरून पेट्रोल विकत घेऊन आणले होते ते प्रवीणच्या चेहऱ्यावर व मानेवर टाकले आणि ते पेटवून दिले व तिथून ते पळून गेले. त्यांना वाटले की मयत कोण आहे? याचा पोलीसांना तपास लागणार नाही व पोलीस आपल्यापर्यंत पोहोचणार नाही.तेथून मग ते परत आले आणि नरेशने त्या दोघांना थोडेफार पैसे दिले व म्हणाला की आपण काही दिवसानंतर प्रवीणने जे घर बुक केले आहे ते त्याच्या आईचा अंगठा घेऊन रद्द करूशरु व ते पैसे आपण तिघे घेऊ त्यानंतर ते तिघात सम प्रमाणात वाटणी करू असे सांगून त्या दोघांना त्याने त्यांच्या मूळ गावी पाठवून दिले आणि तोही तेथून पसार झाला असा सर्व प्रकार पोलीस तपासात उघड झाला आहे.

या गुन्ह्या संदर्भात पनवेल पोलीसांकडे कुठलाही धागा दोरा नसताना निव्वळ तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे व परिसरातील खबरे आणि साक्षीदार मिळवून खऱ्या आरोपींना पोलीसांनी गजाआड केले परंतु या घटनेत प्रवीण तर बायको मिळावी म्हणून जीवानिशी गूला ४० हजार रुपये पण गेले परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे आता त्याची मनोरुग्ण असलेली आई व भाऊ याचे काय? हा मोठा गहन प्रश्न उभा राहिलेला आहे, कारण प्रवीण शिवाय त्या दोघांचं कुणीही नाही अशा या दोघांच्या डोक्यावरील छत्रछाया या नालायक महामूर्ख नराधम लोकांनी पैशाच्या हव्यासापाई प्रवीणचा खून करून त्यांना खऱ्या अर्थाने अनाथ केले सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह,पोलीस सह आयुक्त जय जाधव,पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील परिमंडळ -२,एसीपी भागवत सोनवणे पनवेल, धनाजी क्षिरसागर पोर्ट विभाग नवी मुंबई, यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पो. निरी.रवींद्र दौंडकर, पो.निरी.अंकुश खेडेकर (गुन्हे),गुन्हे प्रगटीकरण पथकाचे एपीआय संजय गळवे, अविनाश पाळदे, निलेश फुले,विवेक भोईर,फौजदार आकाश पवार पो.हवा. महेश धुमाळ, सुनील कुदळे, विकास साळवे, संजय सूर्यवंशी, पो.ना. चंदिले, प्रकाश मेहेर, राकेश मोकल,जयदीप पवार,पो.शि. मिरज पाटील, भीमराव खताळ,तुकाराम भोई, पो.हवा. वैभव शिंदे पो.ना.प्रवीण पाटील या पथकाने परिश्रम घेतले असून पुढील तपास पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे व.पो.निरी. रवींद्र दौंडकर करीत आहेत. ★★★



ए.पी.आय.**संजय गळवे**, ए.पी.आय.**अविनाश पाळदे**, ए.पी.आय.**विवेक भोईर**






पो.हवा.**महेश धुमाळ**, पो.हवा.**सुनिल कुदळे**, पो.ना.**प्रकाश मेहेर**, पो.ना.**पंकज चंदिले**

# प्रेमाची पडली भूल, धोक्याची नव्हती चाहूल, ब्लॅकमेल करत तिच्यावर बलात्कार करी राहूल!

पान नं. १ वरुन... होकारासाठी वेळ मागून घेतला. राहूल हा विचारपूर्वक व हळूहळू स्टेप बाय स्टेप अस्मिताला जाळ्यात ओढत होता. त्याने फेकलेल्या जाळ्यात अस्मिता अलगद अडकली. तिला तो खूप चांगला मुलगा वाटू लागला होता. ती पूर्णपणे आपल्या प्रेमात अडकल्याची खात्री होताच राहूल पुढची स्वप्न रंगवू लागला होता. त्याला तिच्या शरीराचा उपभोग घ्यायचा असल्याने गोड बोलून अस्मिताला राहूलने कल्याण येथे भेटायला बोलविले. तो तिला म्हणाला की, मला तुझी खूप आठवण येत आहे तरी तू कोणत्याही परिस्थितीत मला भेटायला कल्याणला ये. आणि ती सुद्धा यासाठी तयार झाली.

अस्मिता कल्याणला रेल्वे स्टेशनवर राहूलला भेटली. तो तिला म्हणाला की, चल आपण एका गेस्ट हाऊसमध्ये जावून एकातांत गप्पा गोष्टी करुयाऽऽ कल्याण स्टेशनच्या बाहेर असलेल्या कल्याण गेस्ट हाऊसमध्ये तो अस्मिताला घेवून गेला. तिथे गेल्यावर रुममध्ये राहूलने तिच्याशी इकडच्या तिकडच्या गप्पा गोष्टी करुन नंतर तो तिच्या शरीराशी अश्लिल चाळे करु लागताच ती त्याला विरोध करु लागली. परंतु राहूलचा कामाग्नी भडकला होता. त्याला कोणत्याही परिस्थितीत ही संधी जावू द्यायची नव्हती. त्याने बळजबरी करुन तिच्यावर बलात्कार केला. हे करत असतांना त्याने त्याचा मोबाईल अशा ठिकाणी ठेवला होता की, त्यामध्ये बलात्काराचे चित्रण होईल.

राहूलने त्याचा कार्यभार उरकल्यानंतर अस्मिताला दम दिला की, ही गोष्ट तू कुणालाही सांगायची नाही. सांगितली तर विचार करुन ठेव. माझ्यासारखा वाईट माणूस कुणीच नाही. अस्मिताला आता राहूलवर प्रेम केल्याचा पश्चात्ताप झाला. ती खूप रडली. तेथून तिची समजूत काढत राहूलने तिला घरी पाठविले. परत आठ दिवसानंतर त्याने अस्मिताला भेटायला बोलविले. परंतु यावेळेस तिने भेटायला स्पष्ट नकार दिला. तेव्हा राहूल तिला म्हणाला की, तुझे व माझे शरीर संबंध करतांनाचे चित्रण माझ्या मोबाईलमध्ये गुपचूपपणे मी करुन ठेवले आहे. हवे तर तू मला भेटून खात्री करुन घे. जर तू मला भेटायला आली नाही तर मी तो व्हिडीओ व्हायरल करुन तुझी बदनामी करेल. हे ऐकून अस्मिताच्या पायाखालची जमीनच सरकली. ती खात्री करण्यासाठी त्याला भेटायला आली. सर्व प्रथम राहूलने एप्रिल २०२१ मध्ये अस्मिताशी शरिरीक संबंध प्रस्थापित केले. व त्याची व्हिडिओ क्लीप बनवली. त्यानंतर मे २०२१ मध्ये त्याने अस्मिताला टाऊन हाऊस दुर्गाडीजवळ असलेल्या एका हॉटेलमध्ये नेले. व तिथे त्याने तिला ती अश्लिल व्हिडिओ क्लीप दाखवली. आणि म्हणाला की, तुला मी सांगेन तेव्हा भेटायला यायला लागेल. अन्यथा मी ही क्लीप व्हायरल करेल. अशी धमकी देवून मनाविरुद्ध मे व जून महिन्यात तिच्याशी शारिरीक संबंध ठेवले पुन्हा काही दिवसानंतर त्याने उल्हासनगर येथील एका हॉटेलमध्ये बोलवून तिच्या शरीराचे लचके तोडले. त्याने तिला त्याच्या राहत्या घरी कुणी नसतांना नेले. अशाप्रकारे राहूल हा अस्मिताच्या मनाविरुद्ध तिचे शारिरीक शोषण करीत असल्याने तिला काय करावे हे समजत नव्हते. ती आता बी.कॉमच्या फायनल वर्षाचे शिक्षण घेत होती. सदर प्रकार आईला सांगितला तर तिला मोठा धक्का बसेल व आपली समाजात बदनामी होईल. म्हणून हा सर्व प्रकार अस्मिता चूपचापपणे सर्व प्रकार सहन करीत होती.





पो.शि. **सुधीर गडगे**, पो.शि.**दादासाहेब वाघमारे**

ऑगस्ट २०२१ मध्ये राहूलने अस्मिताची भेट घेवून तिची माफी मागत तिला म्हणाला की, मी चुकलो ? मला माफ कर. मी तुझ्याशी लग्न करुन तुला कायम सुखात ठेवेल. लग्नाचे आमीष दाखवून तिचा विश्वास संपादन केला. त्यामुळे पुन्हा अस्मिता पुन्हा त्याच्या बोलण्याला भाळली. तो तिला म्हणाला की, तु तुझे घर सोडून माझ्या घरात रहायला ये. थोड्याच दिवसात आपण लग्न करु. म्हणून त्यासाठी अस्मिताही तयार झाली.

अस्मितामध्ये अमुलाग्र बदल झाल्याचे तिच्या आईच्या लक्षात आले होते. अस्मिता चिड चिड करायची. घरात आईला मदतही करत नव्हती. सतत विचारमग्न असायची. त्यामुळे तिच्या आईने तिला काय झाले आहे म्हणून तिला विचारण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु अस्मिताने काहीएक सांगितले नाही. मुलीचे बाहेर काहितरी वेगळे प्रताप सुरु असावेत. अशी शंका तिच्या आईला सतत येत होती. आणि क्षुल्लक कारणांवरून एक दिवस ऑगस्ट २०२१ मध्ये अस्मिताचे आईसोबत भांडण झाले. तेव्हा तिची आई म्हणाली की, तू माझ्यासोबत येथे राहू नकोस तू घरातून निघून जा. असं म्हणताच ती रागाच्या भरात घरातून निघाली. आणि सरळ तिने राहूलला सांगितले की, मी तुझ्यासोबत रहायला तयार आहे. तिने सरळ विठ्ठलवाडी पोलीस ठाणे गाठले आणि पोलीसांना सांगितले की, माझे राहूल सोबत प्रेंमसंबंध असून मी माझ्या मर्जीने त्याच्यासोबत रहायला जात आहे. म्हणून पोलीसांनी तिच्या आईला बोलवून सांगितले की, अस्मिता सज्ञान आहे. ती तिच्या मर्जीने तिच्या मित्रासोबत रहायला जात आहे. असे अस्मिताने पोलीसांना लिहून दिले. व ती राहूलकडे रहायला गेली. त्यानंतर ते दोघे पती पती पत्नीप्रमाणे राहू लागले. त्यांच्यात शारिरीक संबंध वारंवार येत असल्याने अस्मिता राहूलला म्हणाली की, आपण असे किती दिवस राहणार आहोत. आपण रितसर लग्न करुन घेवू. परंतु राहूल हा सतत उडवाउडवीचे उत्तरं देवून लग्न करण्याबाबत टाळाटाळ करत असल्याचे तिच्या लक्षात आले. राहूल मात्र अस्मितासोबत शरीरसंबंध करत असतांना व्हिडीओ तिच्या मनाविरुद्ध करत असे. तो तिला म्हणायचा की, काही होत नाही. आपण दोघे नवरा बायको तर होणारचं आहोत. आणि हे व्हिडिओ मी लोकांना थोडी दाखवणार आहे. मात्र ज्या मोबाईलमध्ये तो चित्रण करायचा तो मोबाईल तो अस्मिताला कधीच देत नसे.

जून २०२२ मध्ये अस्मिता ही तिच्या बी.कॉम करीता लागणारी शैक्षणिक फी व कागदपत्रे आणण्यासाठी तिच्या आईकडे गेली असता तिची आई घरात नव्हती. म्हणून ती आईची वाट बघत घरी थांबली. त्याठिकाणी राहूल आला अस्मिताला शिव्या देत मारहाण करत तू इकडे का आलीस. तुझा इकडे कोणी यार आहे का ? असे म्हणू लागला. व लगेच सोबत येण्यासाठी जबरदस्ती करु लागला. तेंव्हा मात्र अस्मिताचे डोळे खाडकन उघडले आणि तिने त्याच्यासोबत यायला नकार दिला. त्यावर तो तिला म्हणाला की, लक्षात ठेव. माझ्याकडे तुझ्यासोबतचे शारिरीक संबंधाचे व्हिडिओ आहेत ते मी व्हायरल करुन तुझे जगणं मुश्किल करुन टाकेल. तेवढ्यात तिची आई घरी आली. तिच्या आईला पाहताच राहूलने तिथून काढता पाय घेतला. तिने रडत रडत घडलेला प्रकार तिच्या आईला सांगितला. तात्काळ तिच्या आईने तिच्या पाठिशी ठामपणे उभे राहत पोलीस स्टेशन गाठले व त्याच्याविरोधात एनसी दाखल केली. आणि तेव्हापासून ती तिच्या आईकडे राहू लागली. अस्मिता तिच्या आईसोबत तिचे कपडे व सामान आणण्यासाठी राहूलच्या घरी गेली. तेव्हा त्याला राग आला होता की, मी त्याला सोडून तिच्या आईकडे राहत आहे. त्याने अस्मिताला पकडून हाताच्या चापटीने मारहाण करुन शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. राहूलच्या घरी अनेकवेळा अस्मिताच्या मनाविरुद्ध त्याने त्याने तिच्यावर बलात्कार करुन अश्लिल व्हिडीओ शुटींग केल्या प्रकरणी तक्रार अंबरनाथ येथील शिवाजीनगर पोलीस स्टेशनला गेले. घडलेला प्रकार त्यांनी पोलीसांना सांगितला असता घटनेचे गांभीर्य ओळखून व.पो.निरी. मधुकर भोगे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस स्टेशन अंबरनाथ पूर्व ला गायकवाड पाड्यात राहणाऱ्या राहूल अहिरे याच्याविरुद्ध गु.र.क्र.१९५/२०२२ भा.द.वि.कायदा कलम ३७६(२) (एन), ३२३, ५०६, २०१ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करुन त्याला ताबडतोब त्याच्या राहल्या घरातून अटक केली असता त्याला कल्याण कोर्टात हजर केले असता त्याला कोठडी सुनावण्यात आली. कोठडीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबूली दिली. पोलीसांनी आवश्यक मुद्देमाल जप्त करुन ज्या ज्या ठिकाणी अस्मितासोबत शरीरसंबंध प्रस्थापित केले. त्याठिकाणचा पंचनामा पोलीसांनी केला. व साक्षीदार तपासले.

अस्मिताला पूर्ण जाणीव होती की आपली आई आपल्याला कोणत्या परिस्थितीमध्ये शिकवत आहे. तिने शिक्षणाचे धडे गिरवता गिरवता प्रेमाचे धडे गिरवले.मित्र व प्रेमाच्या गोष्टीत ती फसली आणि सर्वस्व देऊन बसली तिने तात्काळ पोलीस ठाण्यात जाणे गरजेचे होते परंतु ती तेव्हा गेली नाही.ती लग्न न करताच राहुल सोबत लिव्ह अँड रिलेशनशिप मध्ये राहिली. जेव्हा तिला कळून चुकले की राहुल आपल्या सोबत लग्न करणार नाही व आपले जीवन सुखी होणार नाही तेव्हा तिने आईचा हात धरला अशा अनेक तरुणी आहेत की, त्या अशा प्रेमाच्या मोहजाळात फसतात आणि सुंदर व सुखी आयुष्याची बरबादी करून घेत असतात . यासाठी घरातील आई व बहिणीने एवढेच काय तर वडिलांनी सुद्धा मुलींशी व मुलांशी जवळीक साधली पाहिजे त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे जेणेकरून मुली व मुलं ह्या अशा वाईट मार्गावर जाणार नाही व प्रेमाच्या भूलथापांना बळी पडणार नाही. यामध्ये तरुण मुलीचे व तरुण मुलाचे आयुष्य बरबाद होऊन जाते व त्यांच्या आई-वडिलांना कायमस्वरूपी कधीही न भरून निघणारी जखम होते.

या गुन्ह्यासंदर्भात व.पो.निरी.मधुकर भोगे, यांच्या मार्गदर्शना खाली तपासाधिकारी स.पो.निरी. जयेंद्र भोयर यांनी त्यांचे सहकारी स.पो.निरी.सुप्रिया देशमुख, पो.शि. दादासाहेब वाघमारे, सुधीर घडगे यांनी यशस्वीरित्या तपास केला.★★★

## टू व्हिलर चोरणारा गजाआड, विष्णुनगर पोलीसांची उत्तम कामगिरी!

पान नं. १ वरुन... त्याला क्षणाची उसंत न देता ताब्यात घेतले व त्याला चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणले असता त्याने त्याचे नाव मोहम्मद इसाक युनूस खान वय वर्ष ५४ व्यवसाय टेलर काम, राहणार रूम नंबर ३, स्नेहा अपार्टमेंट आजदे पाडा, शंकर मंदिराजवळ डोंबिवली पूर्व असे सांगितले.

त्याच्याकडे चोरीस गेलेल्या मोटरसायकली बाबत चौकशी केली असता तो ताकास तुर लागू देत नव्हता परंतु त्याला खास पोलीस खाक्या दाखविला असता त्याने त्याचा गुन्हा कबूल केला. त्याला रितसर अटक करून कोर्टात हजर केले असता त्याला पोलीस कोठडी कोर्टाने सुनावली कोठडी दरम्यान त्याने टू व्हीलर गाड्या कशा प्रकारे चोरल्या जातात व कधी चोरल्या जातात त्याचे काय होते या संदर्भात माहिती दिली.



या गुन्ह्यात टू व्हीलर गाड्या चोरणारे मास्टर की चा वापर करून त्या मोटर सायकली चोरुन डोंबिवलीमध्येच विकत असतात अशी कबुली दिली आणि अल्प किमतीत मोटरसायकल मिळत असल्याने नागरिकही त्या घेतात असे निदर्शनास आले. अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून मुद्देमाल जमा करण्यात आला असून सदर इसमाने ठाणे शहर आयुक्तालय परिमंडळ-३, कल्याण मधील विष्णुनगर पोलीस स्टेशन, रामनगर पोलीस स्टेशन, टिळक नगर पोलीस स्टेशन, मानपाडा पोलीस स्टेशन अशा हद्दीत चोऱ्या केल्याचे कबूल केले असून सदर इसमाने विष्णूनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ३, रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ५, टिळक नगर पोलीस ठाणे डोंबिवली पूर्व हद्दी तून १, तर मानपाडा पोलीस ठाणे डोंबिवली पूर्व च्या हद्दीतून २ गाड्या सोडण्याचे कबुली दिली आहे.

सदर गुन्ह्यांसंदर्भात अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे पूर्व प्रादेशिक विभाग कल्याण तसेच डीसीपी सचिन गुंजाळ परिमंडळ ३, कल्याण एसीपी सुनील कुराडे डोंबिवली विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली विष्णूनगर पोलीस ठाण्याचे व.पो.निरी. पंढरीनाथ भालेराव यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकातील फौजदार कुलदीप मोरे व पो. शि. कुंदन भामरे यांच्यासह पथकातील स.पो.उपनिरी. नाईकरे, सावंत, पो. हवा. जमादार, पाटणकर, सांगळे, घोलप तसेच पो. ना. तडवी, तुळशीराम लोखंडे, सचिन कांगुणे, विक्रम गवळी, पो. शि. शशिकांत, चालक पो. शि. कमोदकर, वानखेडे यांनी परिश्रम घेतले. ★★★

- राजेंद्र वखरे

## निर्दयी मुलाने दिला आईला गळफास स्वत:वर केले वार...

पान नं. १ वरुन... त्याचे व आईचे भांडण होऊ लागले ही बाब सरोजा यांनी त्यांच्या मुलीला सांगितली बहीण पुष्पलताने भावाला समजावण्याचा खूप प्रयत्न केला परंतु रवीचे व्यसन आता हे हद्दीपलीकडे गेले होते, त्याला दारू पिल्याशिवाय काहीच सुचत नव्हते आणि त्या व्यसनामुळे त्याचे कामाकडेही दुर्लक्ष होऊ लागल्याने त्याच्या कामातही अनेक चुका होऊ लागल्या त्यामुळे त्याला कंपनीमधून सुद्धा खडे बोल सुनावल्या जात होते आणि या अशा ताण तणावातून तो पुन्हा दारू पिऊन यायचा. आई सरोजा ह्या मुलाच्या भवितव्याच्या दृष्टीने चिंताग्रस्त झाल्या होत्या. त्यांना मुलाची काळजी वाटत होती आपले वय आता ६४ आहे. आपले कधी काय होईल हे सांगता येत नाही. आपल्या मुलाने लग्न करावे व सुखाचा संसार थाटावा यासाठी त्या प्रयत्नशील होत्या परंतु रवी मात्र ऐकत नव्हता.अलीकडे रवीने पैसे मागितल्या वर सरोजा देत नव्हत्या आणि यावरून रवी हा आईला शिवीगाळ व अधून मधून मारहाणही करू लागला होता . म्हातारी सरोजा ही मुलाला शिव्या देऊ नको मला मारू नको मी तुझी आई आहे मी तुझ्या भल्यासाठीच तुला पैसे देत नाही असे त्या म्हणत होत्या परंतु रवी मात्र आईचे काहीच ऐकत नव्हता त्याला आई म्हणजे दुश्मन वाटू लागली होती कारण की, वडिलांच्या पेन्शनचे पैसे येत असतानांही आई आपल्याला खर्चासाठी व दारू पिण्यासाठी पैसे देत नाही याचा त्याला आईचा राग येत होता आणि मग त्याच्या डोक्यात रागातून अनेक विचार येऊ लागले होते. त्यादिवशी सकाळ पासूनच त्याच्या जवळच्या पैशाची दारू पिऊन रवी झिंगत होता मायलेकांमध्ये तू तू में में झाली होती त्याला त्याच्या आईचा खूपच राग आला होता ५ सप्टेंबर २०२२ च्या रात्री आईने त्याच्यासाठी जेवायला बनवले तो आईने बनवलेले जेवण जेवला परंतु त्याच्या डोक्यात आई बद्दल राग होताच त्याने त्या दिवशी आईचा खून करण्याचा प्लॅन रचला रात्री सगळीकडे सामसूम होण्याची तो वाट पाहू लागला तो राहत असलेल्या इमारतीमध्ये जास्त रहिवाशी उर्वरीत पान ४ वर...





पो.हवा.(रायटर) **राजेंद्र ठोंबरे**, पो.हवा.**ए.व्ही.भांगरे**

## मोटर सायकल व रिक्षा चोरणाऱ्या चोरट्याला अटक!

**क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क (कल्याण) :** एपीएमसी मार्केट गोविंदवाडी रोड, कल्याण येथे एक जण चोरीची मोटार सायकल विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची गुप्त बातमी बाजारपेठ पोलिस स्टेशनचे पो.हवा. सचिन साळवी यांना मिळाली. सदरची माहिती ताबडतोब व. पो.निरी. नरेंद्र पाटील यांना कळवून त्यांच्या मार्गदर्शनाखाली एपीएमसी मार्केट कल्याण येथे डिटेक्शन इन्चार्ज सपोनि घोलप यांनी डीबी पथकासह त्या ठिकाणी सापळा रचला. बातमीदाराने दिलेल्या माहितीनुसार आलम अनिस शेख नामक संशयित आरोपी इसमास त्याच्याकडे असलेल्या चोरीची जुपिटर मोटर सायकलसह त्याला पळून जाण्याचा वाव न देता डिटेक्शन पथकाने मोठे शिताफीने ताब्यात घेतले. त्याला पोलीसी खाक्या दाखवत त्याच्याकडे कसून तपास केल्यानंतर तपासात त्याच्याकडून खालील चोरीच्या गाड्या मिळून आल्या. १) बाजारपेठ पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर १९८/२२ भादंवि कलम ३७९, ३४ मधील चोरीस गेलेली ज्युपिटर मोटर सायकल २) महात्मा फुले पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ४५०/२२ भादंवि कलम ३७९ मधील चोरीस गेलेली पॅशन-प्रो मोटर सायकल ३) खडकपाडा पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर २५७/२२ भादंवी ३७९ या गुन्ह्यातील चोरीस गेलेली हिरो होंडा स्प्लेंडर मोटर सायकल ४) एक रिक्षा क्र. एमएच ०५ सीपी १३२४ अशा एकूण ३ मोटर सायकल व १ रिक्षा ज्याची अंदाजे किंमत ९२,०००/-रुपये चा मुद्देमाल सदर चोरट्या कडून हस्तगत करण्यात आला असून पुढील तपास पो. हवा. पावशे करीत आहेत.★★★



# मुंबईत शालेय विद्यार्थ्यांना ड्रग विकल्याचा प्रकार, महिलेला अटक!

क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क

**मुंबई** : शालेय विद्यार्थ्यांना नशेचे पदार्थ विकत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याच प्रकरणी मुंबईतील बोरिवली एमएचबी पोलिसांकडून गुरुवारी दुपारी एका ५२ वर्षीय महिलेला अटक करण्यात आली आहे. शालेय विद्यार्थ्यांना नशेचे पदार्थ विकत असल्याचा आरोपाखाली ही अटक करण्यात आली आहे. आरोपी महिलेकडून २५०ग्राम वजनाच्या गांजा हस्तगत करण्यात आला आहे.

गुरुवारी दहिसर भागातील एका उद्यानात शालेय गणवेशात काही मुले धूम्रपान करत असल्याचे शिवसैनिकास आढळून आले होती. यानंतर ही बाब त्याने शाखाप्रमुख भूपेंद्र कवळी यांना फोनद्वारे कळवली. यानंतर शाखा प्रमुखाने सदर ठिकाणी जाऊन त्या मुलांना पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, यापैकी तीन मुले पळून जाण्यात यशस्वी झाली. मुले पळाल्यामुळे काही तरी गैरप्रकार होत असल्याचं ध्यानात येताच कवळी यांनी त्या मुलाला नाव आणि शाळेचे नाव विचारून माहिती घेतली आणि ही बाब पोलिसांना कळवली. यानंतर एमएचबी पोलिसांनी गणपत पाटील नगर गल्ली नंबर १ मधून एका ड्रग विकणारी ५२ वर्षीय मुस्लिम महिलेला काल दुपारी अटक केली आहे. अटक करण्यात आलेली आरोपी



महिला गेल्या काही वर्षांपासून शाळेच्या आणि कॉलेजच्या मुलांना ड्रग विक्री करण्याचं काम करत होती. दरम्यान ड्रग विकणारी महिलेला अटक केल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे.

तसेच या प्रकारानंतर बोरिवली आणि दहिसर पश्चिमच्या परिसरामध्ये शाळेमध्ये शिकणाऱ्या मुलांच्या पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, अटक करण्यात आलेल्या महिलेची एमएचबी पोलीस कसून चौकशी करत आहेत.★★★

# चाइल्ड पोर्नोग्राफी विरोधात सीबीआयचे २० राज्यांमध्ये ५६ ठिकाणी छापे

क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क

**दिल्ली** : ऑनलाइन चाइल्ड पोर्नोग्राफी प्रकरणी सीबीआयने शनिवारी २० राज्यांतील ५६ ठिकाणी छापे टाकले. केंद्रीय तपास यंत्रणेच्या या ऑपरेशनचे नाव मेघदूत होते.सीबीआयच्या म्हणण्यानुसार, अशा अनेक टोळ्यांची ओळख पटली आहे,ज्या चाइल्ड पोर्नोग्राफीशी संबंधित कंटेन्ट वापरत नाहीत तर मुलांना शारीरिकरित्या ब्लॅकमेल करून त्यांचा वापर करतात. या टोळ्या गटाने आणि वैयक्तिकरित्या कार्यरत आहेत. न्यूझीलंड इंटरपोलने विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे बाल लैंगिक शोषण सामग्रीच्या कथित पोस्टिंग आणि प्रसारामध्ये गुंतलेल्या व्यक्तींबद्दल सिंगापूरला माहिती शेअर केली होती. सिंगापूरने भारताला याची माहिती दिली, त्यानंतर सीबीआयने ही कारवाई केली.

नोव्हेंबर २०२१ मध्ये सीबीआयने असेच 'ऑपरेशन कार्बन' केले होते, जेव्हा ८३ लोकांविरुद्ध देशभरात ७६ ठिकाणी छापे टाकण्यात आले होते आणि अनेक लोकांना अटक करण्यात आली होती. सीबीआय ही इंटरपोलची नोडल एजन्सी देखील आहे,ज्याकडे आंतर राष्ट्रीय बाल लैंगिक अत्याचार फोटो आणि व्हिडिओ डेटाबेस आहे, जे सदस्य देशांतील तपासकांना बाल लैंगिक शोषण प्रकरणांचा डेटा शेअर करण्यास परवानगी देते. भारतासह ६४ देशांद्वारे वापरल्या जाणाऱ्या ICSE ने जगभरातील १०,७५२ गुन्हेगारांना ओळखण्यात आणि डेटाबेसमधील २.३ दशलक्ष फोटो आणि व्हिडिओंसह २३,५०० मुलांना त्यांच्या तावडीतून सोडवण्यात मदत केली आहे.यात ओपन नेटवर्कद्वारे डेटा शेअर करण्याची तरतूद आहे, ज्यामध्ये सर्व सदस्य देश तसेच काही विशिष्ट देशांद्वारे प्रवेश केला जाऊ शकतो. सीबीआयने ऑनलाइन बाल लैंगिक शोषणाशी संबंधित प्रकरणांची चौकशी करण्यासाठी २०१९ पासून ऑनलाइन बाल लैंगिक शोषण आणि शोषण प्रतिबंधक तपास नावाचे एक विशेष युनिट देखील स्थापन केले आहे. ही संस्था ऑनलाइन बाल लैंगिक शोषणाच्या सक्रिय संघटित रॅकेटबद्दल दूतावास आणि परदेशी फेडरल तपास संस्थांकडून मिळालेल्या माहितीचे संकलन व तपासणी करते. अल्पवयीन मुलांशी संबंधित कोणतेही लैंगिक कृत्य करताना चित्रण करणे किंवा लहान मुलांना तसं करण्यास भाग पाडणे. असं साहित्य संकलित करणे, दुसऱ्यांसोबत शेअर करणे किंवा इंटरनेटवर लहान मुलांसंबंधित पोर्नोग्राफी सर्च करणे देखील चाइल्ड पोर्नोग्राफी मानली जाते.

# क्राईम शो पाहून कट रचला अन् डेंटिस्टला लुटला!

क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क

**मुंबई** :क्राईम शो पाहून परफेक्ट प्लान करुन तिघा आरोपींनी वांद्रे परिसरात एका डॉक्टरला लुटल्या ची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी वांद्रे पोलिसांनी तिघा आरोपींना अटक केली आहे. इंद्रजित सैनी, सुरेंद्र छेत्री आणि शामल गोपे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपी सुरेंद्रला भारत-नेपाळ-तिबेट सीमेवर तर गोपेला दार्जिलिंगमधून अटक करण्यात आली आहे.या तिघांनी मिळून १२ सप्टेंबर रोजी वांद्रे येथील डेंटिस्ट डॉ. संदेश मयेकर यांच्या घरी घरफोडी केली होती. चोरी केल्यानंतर तिघांनी चोरीच्या मालाची आपापसात समान विभागणी केली आणि त्यानंतर दोघेजण मुंबईतून फरार झाले. चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी बंगल्यातील तसेच आसपासच्या परिसरातील सुमारे ५०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यानंतर पोलिसांना आधी शामलची माहिती मिळाली. त्याचा शोध घेत असतानाच तो दार्जिलिंगमध्ये असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार स्थानिक पोलिसांच्या मदतीने वांद्रे पोलिसांनी शामलला दार्जिलिंगमधून अटक केली. शामलला ताब्यात घेत त्याची चौकशी केली असता सुरेंद्र छेत्रीचे नाव समोर आले. पोलिसांनी सुरेंद्रचा माग काढला. कोलकाता येथून नेपाळला पळून जाण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी तिबेट-नेपाळ सीमेवरील जलपाईगुडी रेल्वे स्थानकावर त्याच्या मुसक्या आवळल्या. त्यानंतर पोलिसांनी शामल आणि सुरेंद्रची आणखी चौकशी केली असता इंद्रजितचा सहभाग असल्याचे उघड झाले.आरोपींनी दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी गोरेगाव पूर्वेतील संतोष नगर येथून इंद्रजितला बेड्या ठोकल्या. तिघेही आरोपी गोरेगाव पूर्वेतील संतोष नगर परिसरातील झोपडपट्टीत भाड्याच्या खोलीत रहायचे. तिघे कॅटररचे काम करायचे. यापैकी इंद्रजीत हा वांद्रे परिसरात कॅटररचे काम करायचा. क्राईम पेट्रोल मालिका पाहूनच त्यांनी चोरीचा डाव आखला. इंद्रजित हा वांद्रे परिसरात केटरर म्हणून काम करत असल्याने त्याला बंगल्यांची माहिती होती. १२ सप्टेंबर रोजी डॉ. मयेकर देव दर्शनासाठी बाहेर गेले असताना आरोपींनी संधी साधत ही घरफोडी केली, अशी माहिती वांद्रे पोलिसांनी दिली. गोपे याने संरक्षक भिंतीवरुन उडी मारून बंगल्यात प्रवेश करत मागील बाजूची खिडकी उघडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील १२ लाख रुपये किमतीचे सोने व मौल्यवान वस्तू चोरले आणि ते गोरेगाव येथील घरी पोहचले. तेथे त्यांनी चोरीचे सोने व मौल्यवान वस्तू वाटून घेतल्या. पोलिसांच्या हाती लागू नये यासाठी चोरीचा माल घेऊन गोपे आणि छेत्री एक्स्प्रेस ट्रेन पकडून वेगवेगळ्या ठिकाणी गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी मयेकर यांच्या आईने घरातील खोलीचा दरवाजा उघडा पाहिला. त्यानंतर चोरीची घटना उघडकीस आली. वांद्रे पोलिसांना याची माहिती देण्यात आली. पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला.★★★

# निर्दयी मुलाने दिला आईला गळफास स्वत:वर केले वार, आईने आत्महत्या केल्याचा केला बनाव!

पान नं. १ वरुन...नसल्याने व तिसऱ्या मजल्यावर रवी व त्याची आई आणि लांबच्या एका फ्लॅटमध्ये एक कुटुंब असे दोघे कुटुंब राहत असल्याने रवीच्या घरात काय होत आहे हे सहसा कुणाला समजत नव्हते. रात्री पुन्हा मायलेकांमध्ये वाद झाला आणि रात्री दीड दोन च्या सुमारास रवीने मागचा पुढचा विचार न करता आपल्या जन्मदात्या आईचा खून करण्याचे ठरवले आणि त्याने घरात असलेली नायलॉनची दोरी घेतली व त्याच्या आईच्या गळ्याभोवती अडकवून ती आवळायला सुरुवात केली. तशी त्याची आई सरोजाची तळमळ होऊ लागली त्या जीव वाचवण्यासाठी आटापिटा करू लागल्या मुलाच्या हाता पाया पडू लागल्या परंतु या निर्दयी मुलाने आपल्या जन्मदात्या आईच्या विनंतीकडे लक्ष न देता त्याने पूर्ण ताकदीने नायलॉनची दोरी आवळली थोड्याच वेळात पाय घासत घासत सरोजा शांत झाल्या आई-मेल्याची खात्री होताच रवीने शांतपणे पाच मिनिटे विचार करून आईच्या गळ्याला दोरीने फास लावला आई मेल्याची खात्री होताच आईला घरात असलेल्या एका मोठ्या टेबलावर स्टूलवर बसविले आणि गळ्यात दाखवलेली दोरी पंख्याला बांधली आणि त्यानंतर आईचा मृतदेह स्टूल वरून लोटून दिला त्यानंतर आईने आत्महत्या केल्याचा बनाव तसेच आपल्यावर हल्ला असा शिन क्रिएट केला करण्यासाठी त्याने घरातून एक हातोडा घेतला व छिन्नी घेतली व स्वत:च्या डोक्यावर त्या अनुकुची दार छिन्नीने वार करुन घेतले व हातोड्यानेही मारून घेत रक्तबंबाड झाला जेणेकरून आपल्या आईने आपल्यावर हल्ला करून नंतर आईने पश्चातापातून आत्महत्या केली असा बनवत्याने रविने रचला. त्यानंतर त्याने त्याची बहीण पुष्पलता हिला एवढ्या रात्री फोन केला व म्हणाला की आई मला मारत आहे तू लगेच घरी ये परंतु पुष्पलता म्हणाली की अरे! रवी आता खूप रात्र झाली आहे आता मी येऊ शकत नाही कारण मुलगाही माझा झोपला आहे मी सकाळी येईल. तु आईकडे फोन दे बरं मी आईशी बोलते असे पुष्कलता म्हणाली परंतु रवीने तो फोन त्याच्या आईला दिला नाही तेव्हा ती म्हणाली की अरे! रवि तू फोन आईला दे तेव्हा तो म्हणाला की, आई तुझ्याशी



पोलीस पथक आरोपी समवेत

बोलायचं नाही म्हणते आणि फोन कट केला. सतत आई व भाऊ रवी यांच्यात भांडण होत असते हे पुष्पलताला माहिती असल्याने तिने फारसे मनावर घेतले नाही परंतु सकाळीच लवकर आंघोळ करून घरचे काम आवरून पुष्पलता आईच्या घरी आली. दरवाजा बंद होता पुष्पलता हीने दरवाजा वाजवला परंतु आतून दरवाजा कोणीही उघडत नव्हते जवळजवळ अर्धा तास दरवाजा वाजवून वाजवून आवाज देऊन देऊन ती थकली होती तिने तिच्या नवऱ्याला फोन करून सांगितले की मी केव्हाचीच माझ्या आईचा दरवाजा ठोठावत आहे परंतु आतून कोणीही दरवाजा उघडत नाही तेव्हा तिचा पती म्हणाला की थोडा वेळ वाट बघ नाहीतर मी येतोच. थोड्या वेळाने घरात काहीतरी धडपडल्याचा आवाज पुष्पलताला आला आणि कुणीतरी दरवाजा उघडायला येत आहे असे तिला वाटले आणि दरवाजा रवीने उघडला रवी हा रक्तबंबाळ झाला होता. त्याने दरवाजा उघडून तो पुन्हा त्या ठिकाणी पडला. पुष्पलताने बघितले की भाऊ हा रक्ताने माखलेला आहे तीने तात्काळ त्याला उचलून साईडला बसवले व पाणी घ्यायला गेली असता घरात त्याची आई पंख्याला लटकलेली तिला दिसली आणि तिने एकच हंबरडा फोडला तीने तात्काळ भावाला पाणी देत तिच्या पतीला बोलवून घेतले ती म्हणाली की तुम्ही ताबडतोब इथे या व कोळशेवाडी पोलीस स्टेशन मध्ये जा आणि पोलिसांना घेऊन या कारण माझी आई पंख्याला लटकलेली असून भाऊ हा रक्ताने माखलेला आहे. हे ऐकताच पुष्पलता यांचा नवरा सेंथिवेल मदस्वामी यांनी घटनास्थळी जाऊन परिस्थिती बघून तात्काळ कोळशेवाडी पोलीस स्टेशन गाठले त्यांनी ठाणे अंमलदार यांना सदर घटनेबाबत माहिती दिली असता ठाणेदार यांनी या गंभीर घटनेची दखल घेत वरिष्ठांना माहिती दिली व बीट मार्शल यांना घटनास्थळी जाऊन शहानिशा करण्यासाठी पाठवले. घटनास्थळी बीट मार्शल पो. हवा. ए.व्ही.भांगरे व पो. शि. ए.एच.पवार हे गेले असता त्यांनी घटनास्थळी एक युवक रक्तबंबाळ झालेला असून एक वृद्ध महिला पंख्याला लटकून मृत अवस्थेत असल्याची माहिती व.पो. निरी. देशमुख यांना दिली तात्काळ घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस पथक घटना स्थळी पोहोचले घटना स्थळावरून वपोनिरी.एम.आर .देशमुख यांनी एसीपी उमेश माने व डीसीपी सचिन गुंजाळ यांना सदर घटनेबाबत बाबत माहिती दिली असता त्यांनी घटनास्थळाला भेट देऊन मार्गदर्शन करून सूचना देत पुढील कार्यवाहीचे आदेश दिले.तात्काळ पोलिसांनी ॲम्बुलन्स बोलवून बाई रुक्मिणी बाई रुग्णालया कल्याण येथे सर्वप्रथम रवीला उपचारासाठी पाठविले त्यानंतर घटनास्थळाचा इनक्वेस्ट पंचनामा फौजदार निकिता भोईगड यांनी करून तो मृतदेह सुद्धा बाई रुक्मिणीबाई रुग्णालयात पाठविला रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रथमोपचार करून रवीला पुढील उपचारासाठी सायन येथे शासकीय रुग्णालयात शासकीय रुग्णवाहिकेने पाठविले तर सरोजा पुमणी यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पोलिसांना सांगितले.

व. पो. निरी. देशमुख यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना विनंती केली की आम्हाला तात्काळ प्राथमिक अहवाल मिळावा त्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मयत सरोजा यांच्या मृतदेहाचे पोस्टमार्टम करून सरोजा यांचा मृत्यू हा गळफास दिल्याने झाला असा प्राथमिक अहवाल देऊन तो मृतदेह पोलिसांना दिला.

परंतु रवी हा पोलिसांना सांगत होता की माझ्या आईने माझ्यावर हल्ला करून तिने आत्महत्या केली आहे पण पोस्टमार्टम रिपोर्ट नंतर हा खून रवीनेच केला असल्याचे पोलिसांच्या लक्षात आल्याने पोलिसांनी सायंकाळी रुग्णालयात असलेल्या रवीला कल्याण येथे आणण्याचे ठरविले सायंकाळी सायन रुग्णालयांनी रवीचा सिटीस्कॅनएक्स-रे काढून तो नॉर्मल असल्याचे पोलिसांना सांगितले तेव्हा पोलिसांनी त्याला सायन येथून कोळशेवाडी पोलीस ठाण्यात आणले येताना पोलीस त्याला म्हणाले की तुझ्या आईच्या अंत्यविधीसाठी तुला जावे लागेल पोलिसांनी तो मृतदेह त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिला त्या मृतदेहावर सरोजा यांच्या नातलगांनी अंत्यसंस्कार केले या अंत्यसंस्कारात रवी सामील झाला होता अंत्यसंस्कार झाल्यानंतर पोलिसांनी चौकशीसाठी रवीला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता तो उडवा उडवीची उत्तरे देऊ लागला पोलीस त्याला म्हणाले की घरामध्ये तू व तुझी आईच होती दरवाजा तूच उघडला तुमच्या दोघा व्यतिरिक्त घरात कोणीच नव्हतं तर तुझ्या आईला गळफास कोण देईल ? या प्रश्नावर रवी हा गप्प झाला पोलिसांच्या प्रश्नांचा बळीमार झाल्याने त्याला काय करावे हे सुचत नव्हते. छिन्नीने स्वत:च्या डोक्यावर करून घेतलेले वार हे स्पष्ट सांगत होते की ,त्याने हा बनाव रचला आहे कारण की त्याच्या डोक्यावर पंचवीस तीस वेळा वारकरे पर्यंत रवी हा प्रतिकार कसा करणार नाही शिवाय वृद्ध असलेली आई तरुण मुलावर वार कशी करू शकेल या एक ना अनेक अशा गोष्टी पोलिसांच्या समोर होत्या.सदर घटनेचा तपास हा एपीआय निशा चव्हाण



मयत सरोजा पुमनी

यांच्याकडे देण्यात आला त्यांनी हा तपास सुरू केला.घरातील सर्व पुरावे हे रवीच्या विरोधात होते परंतु रवीला कुठल्याही प्रकारचा पश्चाताप दिसून येत नव्हता अशा या निर्दयी रवी वर पोलिसांनी गुन्हा रजि.क्र.४५८/२०२२ भा.द.वि. ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला कल्याण कोर्टात पाचव्या न्यायालयात हजर केले असता त्याला सहा दिवसाची पोलीस कोठडी कोर्टाने सुनावली कोठडी दरम्यान पोलिसांनी रवीकडून इत्यंभूत माहिती घेतली. घटनास्थळावरून पोलिसांनी रक्ताने माखलेली चादर नायलॉनची रस्सी, एक लोखंडी हातोडा व लोखंडी छिन्नी हस्तगत करून जप्त केली. या गुन्हा संदर्भात पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ व सहाय्यक पोलीस आयुक्त उमेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली कोळशेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पो. निरी. एम.आर.देशमुख यांच्या नेतृत्वाखाली तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक निशा चव्हाण यांनी फौजदार डी.एन.पवार,महिलापोलीस उपनिरीक्षक निकिता भोईगड, रायटर पो.हवा. राजेंद्र तात्याभाऊ ठोंबरे , बीट मार्शल पो.हवा.ए.व्ही.भांगरे ,पो.शि.ए. एच पवार यांच्या सहकार्याने केला.पोलीस सूत्रानुसार या गुन्ह्यात आरोपी रवी याने दारूच्या व्यसनातून आपल्या वृद्ध आईचा नायलॉनची दोरी तीच्या अडकवून खून केला व तिचा मृतदेह पंख्याला लटकवून आईने आपल्यावर रागाच्या भरात हल्ला करून त्यानंतर मुलाला मारल्याचा पश्चाताप करून आत्महत्या केली असल्याचा बनाव रचल्याचे पोलीस तपासात उघड झाले. त्यानंतर पोलिसांनी रवीची बहीण पुष्पलता व तिचे पती सेंथिवेल मदस्वामी यांच्याकडे अधिक चौकशी केली असता रवी हा सतत दारूच्या नशेत असायचा व आईला त्रास द्यायचा अशी माहिती दिली असून त्यानेच आईचा खून केला असल्याचा संशय व्यक्त केल्याने पोलिसांनी त्या दृष्टीने तपास केला असून तपासात त्यानेच आईचा खून केल्याचे स्पष्ट झाले आहे. कथा लिहीपर्यंत आरोपी हा न्यायालयीन कस्टडीत आहे. कोळशेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एम. आर.देशमुख म्हणाले की,कुटुंबात समन्वय हवा अशा व्यसनाधीन कुटुंबांच्या सामूहिक समोपदेशनाची गरज असून सामाजिक संस्थांनी असे प्रयत्न केल्यास अशा घटना घडणार नाहीत.★

Printed , Published, Owned & Editor - Rajendra Shrawan Vakhare, Printed at SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT. LTD., PLOT. No. W-230, TTC Industrial Area, Khairne MIDC, Navi Mumbai- Dist. Thane.MAHARAHTRA - 400710 Published From - Flat no 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp- Birla College Chikanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist- Thane. Pin Code- 421301- (Maharashtra) Mob. 09987496136,09619630035,08655004586 ( REGD.No.MAHBIL/2010/41122 Email - crimeborder@gmail.com Mob.9619630035

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री.राजेंद्र श्रावण वखरे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया,ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू ,२३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे,एम आय डी सी , ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई ,जि. ठाणे -४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१३०१येथून प्रकाशित केले.(रजि.नं. एमएएचबीआयएल २०१०/४११२२) Email.crimeborder@gmail.com